# महाराष्ट्र शासन
## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई-४०० ०२३

दुरध्वनी क्र.:- (०२२)२२६६४६३८/२२६७१३३३ फॅक्स क्र. :- २२६४४६३८

website :- www.dol.maharashtra.gov.in E-Mail :- director@dol.maharashtra.gov.in


जा. क्र.१४/२०१५-१६/ २७६२२-८० दिनांक :- १८।२।२०१६

**वाचा :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११.
२) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.१४/२०१५-१६/३८०३-५२, दि.१५/०७/२०१५.

**परिपत्रक :-**

शासन सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वंकष धोरण संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहे. ग्रंथालय संचालनालय व त्या अधिनस्त दुय्यम कार्यालयातील गट-क व गट-ड या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२०१५ पर्यंतची अंतिम ज्येष्ठतासूची संदर्भ क्र.२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार ग्रंथालय संचालनालय व त्या अधिनस्त दुय्यम कार्यालयातील गट-क व गट-ड या संवर्गात आधीच्या वर्षी ज्येष्ठता अंतिमरित्या प्रसिध्द केल्यानंतर पुढील वर्षात केवळ नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.०१/०१/२०१६ रोजीची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठता सूची तयार करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठता सूची या परिपत्रकासोबत परिशिष्ट-अ येथे जोडण्यात आली आहे. सदर ज्येष्ठता सूची संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनेनुसार तयार करण्यात आलेली आहे.

२. सदर ज्येष्ठता सूची तयार करताना मुख्यत्वेकरुन महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतूदींचा अवलंब करण्यात आला असून ज्येष्ठतेचे विनियमन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

अ) आयोगपुरस्कृत उमेदवारांची ज्येष्ठता, आयोगाने ठरविलेल्या त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित केली आहे. तसेच, विहित मुदतीनंतर हजर झालेल्या उमेदवारांची ज्येष्ठता, त्यांच्या रुजु झालेल्या दिनांकानुसार निश्चित केली आहे.

ब) पदोन्नत कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता त्यांच्या नियमित पदोन्नतीच्या दिनांकानुसार निश्चित केली आहे. मात्र जर असा दिनांक एकच असेल तर वयाने ज्येष्ठ असलेला कर्मचारी ज्येष्ठ दर्शविण्यात आला आहे.

क) अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता त्यांच्या नियुक्ती दिनांकानुसार निश्चित केली आहे.

३. ग्रंथालय संचालनालय व त्या अधिनस्त दुय्यम कार्यालयातील सर्व कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, प्रस्तुत दि.०१/०१/२०१६ ची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठता सूची त्यांनी आपल्या कार्यालयातील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणावी. तसेच, एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव ज्येष्ठता सूचीत टाकावयाचे राहिले असल्यास किंवा शैक्षणिक अर्हतेत बदल झाला असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्याने कार्यालयामार्फत निवेदन सादर करावे, अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांच्या निवेदनातील वस्तुस्थिती/आक्षेपांची तसेच ज्येष्ठतासूचीतील त्रुटी अथवा वास्तविक चुका (एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव ज्येष्ठता सूचीत टाकावयाचे

राहिले असल्यास) संबंधित कार्यालयाने त्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तक व अन्य उपलब्ध अभिलेख्यांवरुन काळजीपूर्वक तपासून कार्यालयाच्या अभिप्रायासह

निवेदने सदर ज्येष्ठता यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत ग्रंथालय संचालनालयाकडे सादर करावीत. जेणेकरुन त्याची पडताळणी करुन ज्येष्ठतासूचीत आवश्यक ते बदल करणे शक्य होईल. विहित कालावधीनंतर विलंबाने प्राप्त झालेल्या आक्षेप/सूचनांचा कोणत्याही सबबीखाली विचार केला जाणार नाही व ज्येष्ठतासूचीत नमूद केलेला तपशील बरोबर असल्याचे गृहित धरुन अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक व ज्येष्ठतासूची ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्व कार्यालय प्रमुखांनी ज्येष्ठतासूचीची मुद्रित एक प्रत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावी तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून खालीलप्रमाणे अहवाल ग्रंथालय संचालनालयास विहीत मुदतीत सादर करावा.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | ज्येष्ठतासूची पाहिल्याबाबतची दिनांकित सही |
|---|---|---|
| | | |
| | | |

सदरहू ज्येष्ठतासूची मिळाल्याची पोच **पत्राव्दारे** द्यावी.

( किरण गं. धांडोरे )
ग्रंथालय संचालक

प्रति,

१) ग्रंथपाल गट-अ, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई
२) ग्रंथपाल गट-अ, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे/नागपूर.
३) ग्रंथपाल गट-ब, शासकीय विभागीय ग्रंथालय, अमरावती/औरंगाबाद/नाशिक रोड/रत्नागिरी.
४) ग्रंथपाल गट-ब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, जि. रत्नागिरी.
५) सहाय्यक ग्रंथालय संचालक, अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/पुणे/मुंबई विभाग.
६) जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहमदनगर/अमरावती/औरंगाबाद/उस्मानाबाद/कोल्हापूर/गडचिरोली/गोंदिया/जळगाव/जालना/ठाणे/धुळे/नंदूरबार/नाशिक/नांदेड/परभणी/पुणे/मुंबई उपनगर/मुंबई शहर/बीड/लातूर/रायगड/रत्नागिरी/वाशिम/सातारा/सांगली/सिंधुदूर्ग/सोलापूर/हिंगोली.
७) जिल्हा ग्रंथपाल, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अकोला/चंद्रपूर/नागपूर/बुलढाणा/भंडारा/यवतमाळ/वर्धा.

## ग्रंथालय संचालनालय, मुंबई

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/२२, दि२१/१०/२०११ अन्वये विहित केल्यानुसार महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा गट 'क' मधील लिपिक-टंकलेखक (कनिष्ठ लिपिक) या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२०१६ रोजीची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) ज्येष्ठता सूची**

**मंजूर पदे-९६**

**(वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे १९००)**

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्यांचे नाव | प्रवर्ग # (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | $ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता @ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | ६८ | श्रीमती प.रा.ढवळे | अ.जा. | १९/१०/१९९६ | १०/०८/२०१५, कनिष्ठ लिपिक स.ग्रं.सं.का., नागपूर | नामनिर्देशने (अनुकंपा) | १०/०८/२०१५ | ३०/१०/२०५४ | उ.मा.शा.प्र.प., एमएससीआयटी | |
| २. | ६९ | श्रीमती श्वे. शि.नरवडे | अ.जा. (मलोआ) (जा.वै.) | १०/०५/१९८७ | ११/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | ११/०८/२०१५ | ३१/०५/२०४५ | कला स्नातक, एमएससीआयटी, म.४० व इं.४० श.प्र.मि. टंकलेखन | |
| ३. | ७० | श्री.वि.रा.भोसले | खुला (मराठा) (मलोआ) | १४/१०/१९९० | १२/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १२/०८/२०१५ | ३१/१०/२०४८ | वाणिज्य स्नातक, डीओईएससी (सीसीसी), म.३० व इं.४० श.प्र.मि. टंकलेखन | |

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्यांचे नाव | प्रवर्ग # (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | $ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता @ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| ४. | ७१ | श्री.स.भि.गायकवाड | अ.जा. (मलोआ) | २२/११/१९९० | १४/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १४/०८/२०१५ | ३०/११/२०४८ | कला स्नातक, डी.एड., एमएससीआयटी, म.३० व इं.४० श.प्र.मि. टंकलेखन | |
| ५. | ७२ | श्री.पु.भा.राऊत | इ.मा.व. (मलोआ) | ०७/०८/१९८४ | १७/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १७/०८/२०१५ | ३१/०८/२०४२ | कला स्नातक, एमएससीआयटी, म.३० श.प्र.मि. टंकलेखन | |
| ६. | ७३ | श्री.सं.उ.हंबर्डे | खुला (मलोआ) | ०३/०७/१९८९ | १७/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १७/०८/२०१५ | ३१/०७/२०४७ | कला स्नातकोत्तर, एमएससीआयटी, म.३० व इं.३० श.प्र.मि. टंकलेखन | |
| ७. | ७४ | श्रीमती सु.ह.रंगारी | अ.जा. (महिला) (मलोआ) | १०/०६/१९८७ | १७/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १७/०८/२०१५ | ३०/०६/२०४५ | कला स्नातक, एमएससीआयटी, म.३० व इं.४० श.प्र.मि. टंकलेखन | |
| ८. | ७५ | श्री.ध.रा.मऱ्हे | इ.मा.व. (मलोआ) | ३०/०५/१९९० | १७/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १७/०८/२०१५ | ३१/०५/२०४८ | कला स्नातक, एमएससीआयटी, म.३० व इं.३० श.प्र.मि. टंकलेखन, डी.एड | |

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्यांचे नाव | प्रवर्ग # (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | $ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने/ मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता @ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| ९. | ७६ | श्री.क.बा.पाटील | खुला (मराठा) (मलोआ) | २९/०७/१९८७ | १०/०८/२०१५ कनिष्ठ लिपिक, रा.म.ग्रं.,मुंबई | नामनिर्देशने (मलोआ) | १०/०८/२०१५ | ३१/०७/२०४५ | कला स्नातक, एमएससीआयटी, म.३० व इं.४० श.प्र.मि. टंकलेखन | |